# शेगांव नगर परिषद कार्यालय,शेगांव

## जि. बुलडाणा

फोन नं .०७२६५ २५२०१५ ई.मेल co.shegaon@gmail.com

जा.क्रं//भूखंड एकत्रिकरण/नरवि//नपाशे/९७१/२०२१

दि. ८/७/२०२१

एकत्रिकरण आदेश

प्रति,
आदित्य अनघा
मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह
लि. नागपुर, तर्फे समीर सुरेश सराफ

विषय: वाणिज्य प्रयोजना करिता भूखंड एकत्रिकरण मौजे. शेगाव भाग २ येथील शेत सर्वे नं.२९२ व २९३/१ (नजुल शिट न १४/७ प्लॉट न ५/२/७) मधील भूखंड क्र.९,१०

संदर्भ:

१. आपला दि. १२/०५/२०२१ चा अर्ज
२. मा. उपविभागीय अधिकारी खामगाव यांचे अकृषक आदेश एनएपी३४/शेगाव/१२/१९८३-८४ दि.०५/०१/१९८४
३. विकास शुल्क रु .७०६२५ पावती क्र.२८४४२ दि.०८/०७/२०२१

उपरोक्त विषयाचे अनुषगाने आपणास कळविण्यात येते की, मौजे शेगाव भाग २ येथील शेत सर्वे नं २९२ व २९३/१ मधील जमिनीचे अभिन्यास संदर्भ क्र.२ अन्वये मंजूर झाले आहे. प्रस्तावित भूखंडाचे (भुखंड क्रं ९,१०)एकूण क्षेत्रफळ ६२५ चौ.मी असून भूखंड एकत्रिकरणास एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली तरतूद क्रं ३.१२ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४ अनुसार विकास शुल्क रू ७०६२५/ वसूल करून खालील अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

१. भूखंड क्र ९ व १० चे क्षेत्रफळ ३२५ चौ.मी. व ३०० चौ.मी चे एकत्रिकरण खालील प्रमाणे करण्यात येत आहे.
   **भुखंड क्र.९ = ६२५ चौ.मी.**
२. सदर एकत्रिकरण भूखंड क्रं ९ वर विलग पध्दतीचे बांधकाम अनुज्ञेय राहील.
३. सदर भूखंडावर बांधकाम करताना शेगाव नगर परिषद करिता लागू असलेल्या बांधकाम विकास नियंत्रण व नियमवलीचे पालन करावे.
४. अर्जदार यांनी सादर केलेली माहिती कागदोपत्री खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.
५.सदर भूखंडावर बांधकाम करण्यापूर्वी नगर परिषद शेगावची परवानगी घ्यावी लागेल.
६. जमिनीचा मालकी हक्क चतुर्सीमा पोच रस्ता किंवा कोणतेही कारणास्तव भविष्यात वाद उपस्थित झाल्यास त्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
७.पावसाच्या पाण्याचे जलसंधर्व(RAINWATER HARVESTING)ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.
८. विभाजित भूखंडाची नोंद आवश्यक त्या शासकीय निमशासकीय विभागाकडून नियमांनुसार

करणे व त्यास लागणारे शुल्क व इतर कराचा भरणा करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

९. भविष्यात काही शुल्कबाबत तफावत निघाल्यास सदर शुल्क भरणा करणे अर्जदारास/ भूखंडधारकास बंधनकारक राहील.

१०. संदर्भिय आदेश क्र २ व ३ मधील अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारास / भूखंड धारकास बंधनकारक राहील.

११. सदर प्रकरणी अस्तीत्वात असलेल्या ७/१२ मध्ये मंजूर नकाशा नुसार क्षेत्रफळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील.

१२. सदर मंजूर भूखंड विभाजनाचे उपअधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडून सिमांकन करून घ्यावे व मोजणी नकाशा या कार्यालयास सादर करण्यात यावे. सदर मोजणी या कार्यालयात सादर केल्यानंतरच सदर विभाजित भूखंडावर बांधकाम परवानगी देण्यात येईल.

१३. सदरची शिफारस फक्त एकत्रिकरणासाठीत असुन, त्यातील भूखंडाचे बांधकामसाठी नाही.

१४. मुख्याधिकारी नगरपरिषद शेगाव ह्याचे पूर्वपरवानगीशिवाय एकत्रित भूखंडाचे पोट विभाजन करू नये.

(डॉ. प्रशांत शेळके)
मुख्याधिकारी
नगर परिषद शेगाव

प्रतिलिपी :

१. मा. उपधिक्षक भूमीअभिलेख, शेगाव यांना मोजणीच्या उचित कार्यवाहीस्तव सादर.

२. मा.तहसिलदार, शेगाव यांना पुढील महितीस्तव सादर.

३. सहा.कर निरक्षक, न. प. शेगाव यांना उचित कार्यवाहीस्तव रवाना.

४. तलाठी भाग २ यांना आवशयक नोद व उचित कार्यवाहीस्तव रवाना.

(डॉ. प्रशांत शेळके)
मुख्याधिकारी
नगर परिषद शेगाव

आवक/जावक लिपक
उप अधीक्षक भूमि अभिलेख
शेगाव

१२/७/२०२४
तलाठी शेगांव भाग-२
ता.शेगांव जि.बुलडाणा

१२/७/२०२४
प्रेषक
तहसिल कार्यालय, शेगांव